# पवार साहेब, अजून किती शेतकऱ्यांची वाट लावणार



संपादकीय

डॉ. महावीर अक्कोळे
mahaveerakkole@gmail.com

कृषीमंत्री शरद पवारांनी नुकतेच साखर नियंत्रणमुक्त करण्याचे संकेत दिले आहेत. गतवर्षीच्या हंगामात साखरेला चांगला भाव मिळूनही शेतकऱ्यांच्या उसाला मात्र म्हणावा तसा दर मिळाला नाही. साखर ५० रूपये किलोपर्यंत पोहोचली असताना शेतकऱ्यांना मात्र २१०० रूपये प्रतिटन दर दिला आहे. वास्तविक ही शेतकऱ्यांची शुध्द फसवणूकच आहे. या वर्षीच्या गळीत हंगामासाठी शासनाने पहिल्या ९.३० टक्के रिकव्हरीला १३९.०२ रूपये जाहीर केला आहे. तर नंतर च्या पुढील एका टक्क्याल १४६ रूपये शेतकऱ्यांना मिळणार आहेत. म्हणजे यावर्षी शेतकऱ्यांना जेमतेम १४०० ते १५०० रूपये प्रतिटन एवढाच दर मिळणार आहे. ही सगळी करामत आहे ती कृषीमंत्री शरद पवार यांचीच. कारण त्यांनीच एसएमपी बंद करून एफआरपी लागू केलेली आहे. एफआरपीमुळे शेतकऱ्यांची वाट तर लागणारच आहे आणि दुसरे एक सांगायचे तर साखर नियंत्रणमुक्त करणे.

सध्या साखरेवर केंद्र शासनाचे नियंत्रण आहे. साखर लॉबी ही कृषीमंत्री शरद पवार यांच्या दावणीला बांधलेली आहे. पश्चिम महाराष्ट्रात राष्ट्रवादीच्या नेत्यांचीच जास्तीच जास्त साखर कारखाने आहेत. एका अनुषंगाने पाहिल्यास याचा सर्वस्वी फायदा साखर कारखानदारांनाच होणार आहे. कुणाला कितीही दर द्या नि शेतकऱ्यांची लुबाडणूक करा. साखरेवर आता केंद्र शासनाचे नियंत्रण राहणार नाही. कोणताही आधार राहणार नाही. साखर उद्योगावर व त्यावर आधारीत कुटीरोद्योगवर शासनाचे नियंत्रण न राहिल्यास साखरसम्राट मोकाट होणार आहेत. त्याला कायद्याचा काहीही बेस राहणार नाही. त्यातच भारतीय साखर संघ (इस्मा) आणि शुगर को ऑपरेटीव्ह फॅक्टरीज फेडरेशन (एणएससीएसएफ) .या संघटनांनी साखरेला नियंत्रणमुक्त करण्याची मागणी केलेली आहे. वास्तविक साखर नियंत्रणमुक्तची अंमलबजावणी झाल्यास साखर कारखानदार आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांची मनमानी सुरू होणार आहे. शेतकऱ्यांच्या उसाला किती दर मिळणार हे कोणी सांगू शकणार नाही. एफआरपी मुळे शेतकऱ्यांना मोठा तोटा सहन करावा लागत आहे. केंद्र शासन हळूहळू एक जबाबदारी झटकू पाहत आहे. शेतकऱ्यांच्या कडून कमी दराने ऊस खरेदी करून त्याचा मोठा प्रमाणात साठा करून मन मानेल तसे व्यापारी साखरेची विक्री करणार यात शंकाच नाही.

शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर उसाला हमीभाव द्यावा अशी मागणी होत असताना कृषीमंत्री शरद पवार यांनी गतवर्षी एफआरपी लागू करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या अन्नात माती कालवण्याचा प्रकार सुरू केला आहे. एफआरपीवरूनच खासदार राजू शेट्टींनी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी संसदेचे कामकाज बंद पाडण्याचे साहस केले होते. मात्र सत्तेच्या जोरावर कृषीमंत्र्यांनी उसावर एफआरपी लागू केली. उत्तरप्रदेशच्या उसाची रिकव्हरी कमी आहे. जेमतेम ९ ते १० टक्के एवढीच आहे. महाराष्ट्रात रिकव्हरी जादा असली तरीही एफआरपीमधून तोडणी वाहतूक, लेव्ही, इतर कर कमी होणार आहेत. यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनाही यंदा उत्तरप्रदेशच्या शेतकऱ्यांच्या एवढाच उसाला दर मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या उसाला एक वर्ष दर द्यायचे नि पुढील दहा वर्षे लुबाडत राहयचे हा एककलमी कार्यक्रम कृषीमंत्र्यांनी आखलेला दिसतो. कृषीमंत्री आयसीसी चे अध्यक्ष झाले आहेत. त्यामुळे त्यांच्या डोक्यात क्रिकेटची हवा शिरलेली आहे. शेतकऱ्यांचे कल्याण करायचे सोडून ते क्रिकेटचे कल्याण करण्यास प्रारंभ केला आहे.

एकीकडे आम्ही शेतकऱ्यांचे तारणहार आहेत म्हणून भासवायचे नि दुसरीकडे शेतकरीविरोधी धोरणे अंमलात आणायची. हीच रित कृषीमंत्र्यांनी वापरलेली दिसते. शेतकऱ्यांच्या उसाला उत्पादन खर्चावर हमीभाव देणे बंधनकारक पाहिजे. मात्र असे होत नाही. पुढील हंगाम हा आंदोलनाचा आहे. गतवर्षी खासदार राजू शेट्टींनी उसाला दर मागितलेला नव्हता. उसाचे मार्केटिंग करा असा चांगला सल्ला शेतकऱ्यांना दिलेला होता. उसाचे क्षेत्र कमी असल्यामुळे ऊसदराची स्पर्धा लावण्यात आलेली होती. त्यामुळे उसालाही विक्रमी भाव दिला गेला. वास्तविक साखरेचा त्यावेळचा दर पाहता दिलेला दरही कमीच होता. यावर्षी मात्र उसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. शेतकऱ्यांच्या उसाला किती दर मिळेल.हे आताच कोणी सांगू शकत नाही. उद्या शरद पवार साखर आयात करतील नि साखरेचे दर आणखीन खाली आणतील. यांच्या धोरणाचा बळी शेतकरी जात आहे.

साखरेचा काळाबाजार करणाऱ्यांवर केंद्र सरकारने नाममात्र कारवाई केली. अनेकजणांनी यामध्ये मोठी कमाई केली आहे. कृषीमंत्र्यांनी हजारो कोटी रूपयांचा घोटाळा झाला असतानाही स्वतःच्या स्वार्थासाठी त्यांनी काहीच कारवाई केलेली नाही. साखरसम्राट व मद्यसम्राटांना मोठे करण्याचे कामच त्यांनी व त्यांच्या मंत्रालयाने केले आहे. अजून भरपूर घोटाळे आहेत. त्याकडे सुध्दा ना. पवार ,साहेबांनी डोळेझाक केली. सौ चुहे खाके बिल्ली चली हजको असे म्हणून शरद पवार यांनी असा कोणता घोटाळा झालेलाच नाही म्हणून आपले हात झटकले. पवार ,साहेबांच्या अनेक करामती आहेत. एवढीच मागणी करतो की, पवार साहेब शेतकऱ्यांच्या जीवावरच मोठे झाला आहात. त्याच्यांच घरावर नांगर फिरवण्याचा उद्योग आता तरी बंद करा!

◆ वर्ष ५ ◆ अंक १६ ◆१५ जुलै २०१० ◆ **संपादक :** खासदार राजू शेट्टी Email : rajushetti@gmail.com
◆ **कार्यकारी संपादक :** डॉ. महावीर अक्कोळे ◆ **सह संपादक :** डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार,
◆ **मानद सल्लागार :** मा. श्री. अण्णा हजारे राळेगणसिद्धी, न्या. पी. बी. सावंत पुणे, न्या. बी. जी. कोळसे पाटील पुणे, .प्रा. शरद पाटील सांगली, कुमार सप्तर्षी पुणे, माजी आमदार. वामनराव चटप चंद्रपूर ◆ **व्यवस्थापक :** सुभाष शेट्टी
◆ **कार्यालय :** भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

**SWABHIMANI VICHAR (Fortnightly)** स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक *खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशननजीक, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. **Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213**•या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

वार्षिक वर्गणी
रु. १००/-

## राज्यात ३१ सहकारी साखर कारखाने दिवाळखोरीत

▶ पान १ वरुन

जि. अमरावती, १३) फलटण सहकारी साखर कारखाना मर्यादित, फलटण जि. सातारा, १४) सासवडमाळी सहकारी साखर कारखाना मर्यादित, अकलूज ता. माळशिरस जि. सोलापूर १५) पारनेर सहकारी साखर कारखाना मर्यादित, अहमदनगर, १६) बागेश्वरी सहकारी साखर कारखाना मर्यादित,परतूर जि. जालना १७) जगदंबा सहकारी साखर कारखाना मर्यादित, अहमदनगर, १८) शिवशक्ती सहकारी साखर कारखाना मर्यादित, बुलढाणा १९) तासगांव सहकारी साखर कारखाना मर्यादित, पलूस जि. सांगली २०) बालाघाट सहकारी साखर कारखाना मर्यादित, लातूर २१) शंकर सहकारी साखर कारखाना मर्यादित, नांदेड २२) दत्त सहकारी साखर कारखाना मर्यादित, आसुर्ले पोर्ले जि. कोल्हापूर २३) के. के. वाघ सहकारी साखर कारखाना मर्यादित, नाशिक २४) आंबा सहकारी साखर कारखाना मर्यादित,अंजनगावस सर्जी २५) सुधारकराव नाईक सहकारी साखर कारखाना मर्यादित, पुसद २६) बाराशिव हनुमान सहकारी साखर कारखाना मर्यादित, हिंगोली २७) जयजवान सहकारी साखर कारखाना मर्यादित, यवतमाळ २८) शंकर सहकारी साखर कारखाना मर्यादित, मंगरूळ जि. यवतमाळ २९) शेतकरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, किल्लारी ता. औसा जि. लातू ३०) गोदावरी सहकारी साखर कारखाना मर्यादित, शंकरनगर बिलोली जि. नांदेड ३१) कलंबर सहकारी साखर कारखाना मर्यादित, गांधीनगर,ता. लोहा जि. नांदेड ३२) संत मुक्ताबाई सहकारी साखर कारखाना मर्यादित, एदलाबाद जि. जळगांवपरसोडा जि. औरंगाबाद असे एकूण ३२ साखर कारखाने दिवाळखोरीत काढलेले आहेत.


vishal Yadav 9850291294
9921151199



इंडो प्रिंटर सर्व्हिसेस
Dot Matrix Specialist
■ EPSON, TVS, WEP., HP ■ Sales & Services ■ Dot Matrix, Laser, Inkjet Printer Repairs ■ Printers Carteridges & Toner Refilling
चालू स्थितीतील जुने प्रिंटर मिळतील.
९ वी गल्ली, सुभाष रोड, देमापुरे ऑईल मिलजवळ, जयसिंगपूर

आदिशक्ती कन्स्ट्रक्शन
जयसिंगपूर
प्रोप्रा. मिलींद साखरपे

श्री भरत अर्बन को-ऑफ बँक लि., जयसिंगपूर
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२९९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३
■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वत:चे इमारतीत ■ अद्यावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ लाखापर्यंतच्या ठेवीस विमा संरक्षण देशातील प्रमुख ४८८ शहरांवरील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज ■ १० ग्रॅम चोख सोन्यास रु. १३००० कर्ज १२ टक्के व्याजदराने

| ठेवी | कर्जे | ऑडिट वर्ग | | स्वभांडवल | गुंतवणूक | एन.पी.ए. |
|---|---|---|---|---|---|---|
| ४१४७.९५ | २१७८.७१ | ---- | नफ्यात | ४५५.१५ | २१८९.४३ | ३.३७ टक्के |

श्री. व्ही. बी. हुग्गे. — बी. ए. बी. कॉम. — चिफ एक्झि ऑफिसर
श्री. अशोक शां रूणवाळ. — बी. कॉम — व्हा. चेअरमन
पै. विठ्ठल बाबूराव मोरे — एम. ए. — चेअरमन
व सर्व संचालक

TEXMO INDUSTRIES




जैन एच.डी.पी.ई. पाईप्स
Taro
SKF Ball Bearings
BCH स्टार्टर
अधिकृत विक्रेते
बाहुबली इलेक्ट्रिकल्स
आझाद रोड, ८वी गल्ली,जयसिंगपूर.
फोन:(०२३२२)२२५९०५,२२७४०५ मोबा.:९४२११७३१४७
गोमटेश इलेक्ट्रिकल्स
जामे मस्जिद समोर, मेट्रो ऑटोजवळ,पटेल चौक,सांगली.
फोन नं.(०२३३) २६२१०९६ मोबा.:९९६०४०६३१३

TEXMO
AQUATEX
अधिकृत विक्रेते
श्री वितराग एंटरप्रायझेस
सोन्या मारुती मंदिरासमोर, कोल्हापूर रोड, इचलकरंजी
फोन : (ऑ.) ०२३०/ २४३१०८
मोबा. : ● विपुल - ९३२६९५३०२७ ● बाबासाहेब : ९३२५७६१२२९



प्रोप्रा. अरुण किर्तीकुमार माणगावे
M/S. MANGAVE BOREWELLS
BOREWELL CONTRACTOR
Opp. Mangave Petrol Pump. Jaysingpur. Dist : Kolhapur (M.S.)
Ph. (02322) 229866. Mo. 9822551008/9422428266



Shree Datta Prestrestess
M.f. PCC Pole
Shirol Road, Jaysingpur.

# शेतकऱ्यांचा गुरू कि लुटारू?

आपल्या समाजात अलीकडच्या काळात शिक्षणाचे महत्व वाढते आहे. अगदी ग्रामीण भागातील कुटुंबांमध्येही मुलांच्या शिक्षणासाठी काळजी घेतली जाऊ लागली आहे. आता पन्नाशीला आलेल्या पिढीची गत वेगळीच होती. त्या वेळी शिक्षण हे असावं म्हणून घेण्याची वृत्ती होती. पुढे ती आवश्यक गरज बनत गेली. शेतकऱ्यांची मुलंही कधी शाळेत गेली, कधी नाही गेली तरी चालत होतं. घरी शेताकडची कामं असली तर पोरांच्या शाळेला बुट्टी ही ठरलेली. बरे, शाळा नसल्यावर एक तर घरची गुरं वळायचं काम पोरांच्या अंगावर सोपवंल जायचं किंवा शेतातल्या कामाला जुंपावं लागायंच. त्यामुळे नऊ – दहा वर्षांच पोर झालं की त्याच्या शाळेला अधूनमधून खोडा बसायचाच. अगदी गुडघ्याएवढं पोरसुध्दा कामाला येतं घातीच्या वेळंला अशी एक म्हण ग्रामीण भागात रूढ आहे ती याचे निदर्शक ठरते. त्यातून तयार झाले ते शेतकरीच ! लहानपणापासूनच ती कामं हाताशी आली. ही शेतकऱ्यांच्या घरची अवस्था, तर मोलमजुरी करणाऱ्यांची पोरं तर शाळेला रामराम ठोकूनच कुणाकुणाची शेरडं – करडं, गुरं वळायची कामं पावसाळ्यात घ्यायची. तीसुध्दा पैशासाठी नाही तर केवळ दोन वेळचं जेवणाच्या बोलीवर. ग्रामीण भागातील ही पिढी अशाच वातावरणात वाढलेली. पण आता तीही अनुभवानं शहाणी झाली. आपण बैलांची शेपटं मोडली. आता पोरांना तरी ते करायला लागू नये, अशी भावना वाढली.

आपल्या समाजातील धारणेनुसार पहिला गुरू म्हणजे आई – बाप! त्यांचे संस्कार व नंतर शाळेतल्या गुरूजींचे त्यावर सोपस्कार. एवढं झालं की झाला माणूस तयार अशीच आजवरची वाटचाल. एकदा व्यवहारात तो आला की त्याला डाळ – आट्याचा भाव कळायला लागतो. चे कळता – कळता तो कधी बुजुर्ग बनतो ते त्यालाही कळत नाही. पण आता शिकल्या – सवरल्या शेतकऱ्यालाही एक नवीन गुरू मिळाला आहे. शेतकरी अडाणी असला तरीही त्याला याच गुरूची मदत लागते व तो शिकलेला असला तरीही त्याच्याच सावलीला तो जातो. हे व्यावसायिक गुरू आहेत. शेतीसाठी लागणाऱ्या बी – बियाणे व कीटकनाशक, पीकवाढीच्या औषधांचे विक्रेत, जिकडे शेतकरी तिकडे गुरू तयारच आहेत. वेगवेगळ्या भाराभर कंपन्या त्यांनी वेगवेगळ्या किडींवर प्रतिरोधक काढलेली औषधे. पिकांना अधिक अन्नद्रव्य मिळण्यासाठी काढलेली विविध प्रकारची रासायनिक खते, सेंद्रिय खते, कंपन्याही इतक्या की त्यांची नावेही कोणाच्या लक्षात राहणार नाहीत. त्यामुळे आजचा शेतकरी गुरू सांगतील ते औषध, तेच खत, तेच बियाणे घेऊन मोकळा होतो.

प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी, त्या त्या भागातील प्रत्येक बाजारपेठेच्या गावाच्या ठिकाणी अशी कृषीसेवा केंद्रे उभी आ– हेत. शेतकरी नेमका तेथेच जातो. त्याशिवाय त्याला पर्यायही नसतो. गावातल्या गावात असा कुणी तज्ज्ञही नसतो. एकाने अमुक एक कीड पकडल्यावर तमुक एक औषध फवारावे असे सांगितले तर तेच औषध पुन्हा मिळेलच असे नाही. औषधांच नाव बदलंत. कंपन्या बदलतात. पिक तीच जमिनी त्याच. मातीही तीच किडीही त्याच फक्त औषध व कंपन्यांच वेगवेगळ्या.

टोमॅटो लावला, कांदा लावला तर अशा नाजूक पिकांवर हवामानाने व मातीतील संसर्गातूनही रोग पडतो. या पिकाच्या लागवड करताना शेतकरी मनाशी हिशोब करीत असतो. चार पैसे मिळाले पाहिजेत. या त्याच्या आशेवर पाणी फिरण्याची वेळ येते. ती करपा किंवा टोमॅटोवरील किडीने ! टोमॅटोचं रोपं लावले की ते वितभर होण्याच्या आतच त्याच्यावर किटकनाशकांचा मारा सुरू होतो. अनेकदा मातीतून किड वर येते आणि टोमॅटोचे रोप करडून टाकते, अशी तुटलेली रोपं गोळा करण्याची वेळ शेतकऱ्यांवर येते. तो हातातील कामे टाकून तातडीने गाठतो ते किटकनाशकाचं औषधाचं दुकान. त्याला फक्त सागांयच की टोमॅटोला काय होतयं. कारण किडीचं नाव माहितं नसतं. त्याच्यावर औषध काय आणायंच हे ही माहितं नसते. पण दुकानदार गुरूच पुढचं सगळ पाठ असतं. एकदम दोन तीन किटकनाशचे बाटल्या तो पुढे ठेवतो. त्या बाटलीम धील औषध कुठल्या कंपनीचे आहे त्यावर किंमत किती आहे. त्याचं इतर औषधांच्या घटकाचे नातं कसं राहिल याची काहीही माहिती शेतकऱ्याला देण्याची गरज नसते. मग कोणकोणत्या बाटलीतील औषध एका सोळा लिटरच्या फवारणी पंपासाठी औषध घ्यायंच हे गुरू सांगतात. ते घेताना मिली कोण घेत बसतो? शेतकऱ्याला किती कळते? मग शेतकऱ्यांचे गुरू त्यांना सांगतात. ती बाटलीतील कीटकनाशके बाटल्यांच्या टोपणाने घ्यायला त्यात किती मिली जातं हे त्यांना अंदाजाने माहित असतं. शेतकरीही आपल्या प्रकृतीसाठी डॉक्टरकडून गोळ्या घेताना जेवढी काळजी घेणार नाही, त्यापेक्षा जादा काळजी या औषधाच्या वापरावर घेतो. शेतकरी औषध निर्मित करणाऱ्या कंपन्यांत नावंही विचारत नाही. कारण ते त्याला ठाऊकही नसतं. रासायनिक खतांबाबतही फारशी वेगळी अवस्था नाही. कांदा, बटाटा, मिरची, टोमॅटो लावलाय एवढंच सांगायचं. किती आणि कोणतं खत टाकू हे विचारण्याची गरज नाही.

कोल्हापूर सांगलीत उसाची गोडी व साखरेचे प्रमाण चांगले येते. पण मराठवाड्यात ती तेवढी दिसत नाही. मातीच्या मगदुरानुसार त्यातील पिकांना खते द्यावी लागतात. असे सर्वत्र सांगितले जाते. पण शेतकरी असे सल्ले आपल्या खतविक्रेत्या गुरूवर सोपवून मोकळा होतो. त्यानंही कधी याच्या शेतातली माती किंवा तिचा मगदूर पाहिलेला नसतो. तोही सर्वसाधारणपणे अंदाजाने एक एकराला एवढी पोती खतं असं सांगतो व शेतकरी त्याचं गुमानं ऐकतो. यात शेतकऱ्यांच्या आपल्या खतविक्रेच्या गुरूवर प्रचंड विश्वास असतोच. पण खते किंवा कीटकनाशके, पीकवाढीला जोम देणारी संवर्धके अशा सर्व मालावर लिहिलेली असते. एमआरपी म्हणजे कमाल विक्री किंमत. आपण कपड्याच्या दुकानात गेलो तर १५० रूपये एमआरपी शर्ट शंभर रूपयाला मागतो. शेवटी व्यवहार सव्वाशे रूपयांवर होतो. पण खते, बियाणे व कीटकनाशकांच्या एमआरपीवर शेतकरी चकार शब्द काढत नाही व विक्रेता बिल करतो. तेच मुळात एमआरपीसह गुमान पैसे काढून बिल चुकते केले जाते. असे लाखो शेतकरी कोट्यवधी रूपयांची खरेदी करतात. ग्रामीण भागात तर अधिकृत बिलाचेही वाट शेतकरी बघत नाही. कागदाच्या चिठोऱ्यावर बेरीज करून विक्रेता सांगेल तेवढे पैसे देऊन तो बाहेर पडतो. हे असं कुठवर चालायचं?

# सरकार करतेय शाब्दिक खेळ

▸ पान १ वरून

आहोत. साखर उद्योगाच्या मागणीनुसार केंद्र सरकार साखरेचा लेव्हीचा कोटा एकूण उत्पादनाच्या २० टक्क्यांवरून १५ टक्के करण्याच्या विचारात असल्याचे वृत्त आहे. मागील वर्षांपर्यंत हा कोटा दहा टक्के होता. नंतर तो २० टक्के करण्यात आला. वास्तविक हा कोटा दहा टक्केच असावा अशी आमची आग्रही मागणी आहे. सरकार १३ रूपये ६० पैसे प्रति किलो दराने लेव्हीची साखर खरेदी करत असते. हा दर किमान२२ – २३ रूपये प्रति किलो असावयास हवा.याचे कारण खुल्या बाजारातील साखरेचा दर २७ रूपये प्रति किलो इतका आहे.या पार्श्वभूमीवर १३ रूपये ६० पैसे हा लेव्ही साखर खरेदीचा दर बराच कमी असल्याचे लक्षात येते. आणखी एक महत्वाची बाब म्हणजे या वर्षी राज्यात साखरेचे दर घसरून कारखानदार अडचणीत येतील का? अशीही शंका व्यक्त केली जात आहे. वास्तविक साखरेचे दर आंतरराष्ट्रीय बाजारभावावर अवलंबून असतात. आणि आंतराष्ट्रीय बाजारभावावर अवलंबून असतात. आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील भाव पेट्रोल तसेच डिझेलच्या किंमतीवर अवलंबून असतात. याचे कारण आंतरराष्ट्रीय पातळीवर ब्राझील हा सर्वात मोठा साखर उत्पादक देश आहे. कारण या देशात साखर आणि इथेनॉल अधिक भर दिला की साखरेचे उत्पादन कमी होते. मग आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेच्या किंमती खाली येतात. त्याचे परिणाम इतर देशातील बाजारपेठेवर होणे साहजिक होते.

राज्यात पुढील गाळप हंगामात उसाचे विक्रमी उत्पादन होणार आहे. असा परिस्थितीत या संपूर्ण उसाच्या गाळपाचा प्रश्न उभा राहणे साहजिक आहे. त्यासाठी राज्यातील बंद असलेल्या ६७ साखर कारखान्यांपैकी २० ते २२ कारखाने पुन्हा सुरु करण्याचा राज्य शासनाचा विचार असल्याचेही दिसते. अतिरिक्त उसाला अनुदान देण्याची वेळ आल्यास सुमारे ३५० कोटी द्यावे लागणार आहेत. त्याऐवजी बंद कारखान्यांना आवश्यक मदत करणे सरकारला परवडेल असाही युक्तीवाद केला जात आहे. अर्थात साखर कारखान्यांना परवानगी देण्याचे धोरण शासनच राबवत असते. यापूर्वी शासनाने विविध साखर कारखान्यांना परवानगी देण्याचा सपाटा चालवला होता. परिणामी कारखाने वाढले पण उसाच्या लागवडक्षेत्रात म्हणावी तशी वाढ झाली नाही. त्यामुळे अनेक कारखाने पूर्ण क्षमतेने चालवणे कठिण होत चालले. त्यातून कारखान्यांसमोर आर्थिक अडचणी उभ्या राहिल्या. मग काही कारखाने अवसायानात काढावे लागले तर काही बंद पडले. पुन्हा अशा कारखान्यांना अनुदान देण्याचे शासनाने ठरविले. बहुतांश कारखानदार सत्ताधारी पक्षातील असल्याने असे अनुदान मिळवणे शक्य झाले. पण त्यातून उत्पादकांचा अंतिमतः फायदा झालाच नाही. आधी स्वतःचे हित, नंतर उत्पादकाचे असे या कारखानदारांचे धोरण असते. त्याला शासनाचीही साथ लाभते. थोडक्यात, साखर कारखान्यांना परवानगी देणारे शासनच अशी अवस्था आहे. आ– ताही शासनाने बंद अवस्थेतील काही साखर कारखाने सुरू करण्याचा निर्णय घेतला तरी त्यातून उत्पादकांचे कितपत हित साधले जाईल, याविषयी शंका आहे. एकूणच शासनाने घेतलेल्या या काही निर्णयांमधून उत्पादकांना थोडा लाभ झाला तरी खऱ्या अर्थाने समाधान मिळेल.

# शेतीला नव्या प्रश्नांचा गराडा

पुरोगामी महाराष्ट्रात आज सर्वात कठीण दिवस शेती व शेतकऱ्यांसाठी आले आहेत. शेती हा भारताचा मुख्य व्यवसाय. आजही तो आहे. शेतीवर देशाचा अर्थसंकल्प अवलंबून असतो. एक वर्ष शेती नाही पिकली तर सारे डेपाळून जाते. व्यापारी, उद्योजकांना कामच उरत नाही. त्याच्यावर माशा मारायची वेळ येते. शेतकऱ्यांशिवाय बाजार हालत नाही. सारे काही शेतीवर अवलंबून आहे. ज्याच्या जीवावर उद्योजक, राजकारणी, व्यापारी उड्या मारतात तो शेतकरी जगला तर आपले सर्व काही चालणार आहे. हे माहीत असून देखील त्याला सारेच ओरबाडीत आहेत. त्यातून तो पूर्ण नागवला जातो आहे. त्याला शेती परवडेनाशी करून टाकली आहे. जगण्याच्या संघर्षासाठी ती विकणे एवढाच पर्याय त्याच्यापुढे ठेवला जात आहे. आजदेखील कोकण, मावळ भाग व दुष्काळी पट्ट्यात मोठ्या प्रमाणात शेतीचे व्यवहार होत आहेत. नोकरदार, उद्योजक, राजकारणी ही मंडळी भ्रष्टाचार करुन काळा पैसा जमवीत आहेत व तो शेतीत गुंतवीत आहेत. आज गुंतवणूक म्हणून शेती सर्वात उत्तम व सुरक्षित पर्याय आहे. खरे तर ती ठेव पावतीच आहे.

त्यामुळे जमिनी खरेदी करून त्यांचा विकास केला जात आहे. या जमिनी मिळविण्यासाठी सारे घटक शेतकऱ्याला मदत करण्याऐवजी तो अडचणीत कसा येईल हे पाहात आहेत. एका बाजूला अधुनिकतेचे गाजर दाखवायचे व दुसऱ्या बाजूला त्या ला फसवायचे, असे उद्योग आता नित्याचे झाले आहे.

आज बोटावर मोजणारे शेतकरी तेवढे चांगले उभा आहेत. ही संख्या कशीतरी चार टक्क्यांपर्यंत पोहोचेल. बाकीचे सारे कर्जबाजारी, अडलेले, रडलेले, शेतीवर आपले घर देखील चालवू न शकलेले असे आहेत. नव्या तंत्रज्ञान, बियाणी, खते, औषधे आदी सारे विकत घेण्याने उत्पादन खर्च वाढला आहे. शिवाय या गोष्टी दर्जेदार असतील यांची हमी नाही. उलट यामध्ये शेतकऱ्यांची मोठी फसगत सुरु आहे. त्यामुळे उत्पादन वाढत नाही. त्याला दर्जा नाही. बाजारात किंमत नाही. त्यामुळे आतबट्ट्यात व्यवहार ठरत आहे. त्यात शेतमजूरांपासून व्यापाऱ्यापर्यंतचे सारे घटक केवळ त्याला ओरबाडीत आहे. या संपूर्ण यंत्रणेवर कोणाचे लक्ष नाही. कोणाचे नियंत्रण नाही. सरकार, नोकरशाही, राजकारणी हे सारे घटक जेथे संधी मिळेल तिथे शेतकऱ्यालाच नागवण्याचा उद्योग करीत आ-हेत. त्यामुळे हे सारे घटक गब्बर झाले पण शेतकरी आहे तिथेच आहे.

### बागायत क्षेत्र वाढत नाही

सरकारकडे इच्छाशक्ती नसल्याने शेतीला पाणी मिळत नाही. शेतीचे सारे प्रकल्प अर्धवट ठेवलेले आहे. थोडेथोडके नाहीत तर किमान तीस-चाळीस वर्षे ते अर्धवट आहेत. ताकारी पाणी योजनेसारखा प्रकल्प तीस-चाळीस वर्षे रेंगाळलेला आहे. दरवर्षी त्यासाठी हजारभर कोटींची तरतूद होते. त्याच्या ठळक बातम्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होतात. पुढे त्याचे काय होते ते पाहण्यास त्यांनाही वेळ नाही. काही तरी काम दाखविले जाते व सारा पैसा नोकरदार, नेतेमंडळी व कंत्राटदार, दरोडेखोरांनी वाटून घेतल्यासारखा तो वाटून घेत आहेत. पुरोगामी महाराष्ट्रात आपण २० टक्के जमीन सुद्धा बागाईत करू शकलेलो नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या तीन पिढ्या या पाण्याच्या प्रतिक्षेत बरबाद झालेल्या आहेत.

सुधीर श्रीधर कुलकर्णी
रेणुसिद्ध कॉम्प्लेक्स, गोरे मंगलकार्यालयाजवळ गावभाग, सांगली.

**शेतीला पूर्वीपासून निसर्ग, व्यापारी, दलाल यांचे फटकारे बसत आहेतच. आता मात्र अनेक मानव निर्मित प्रश्न शेतीला भेडसावू लागले आहेत. एका बाजूला शेती व शेतकऱ्याबद्दल कळवळा व्यक्त करायचा. दुसऱ्याबाजूला त्याला सर्वांनी ओरबाडायचे व आपली पोळी भाजून घ्यायची हे नित्याचे झाले आहे. यामुळे तो आणखी अडचणीत येत आहे. त्यातून असहाय्य बनल्यावर त्याला एक तर शेती कवडीमोलाने विकायची, नाहीतर आत्महत्या करायची हे दोनच पर्याय उरतात. पॅकेजचे ढोल वाजवले तरी आत्महत्या आजही सुरू आहेत. आता त्याबद्दल कोणालाच काही वाटणे बंद झाले आहे. सारे समाजमनच बधीर झाले आहे.**



ज्या योजना सुदैवाने पूर्ण आहेत त्यांचे पाण्याचे नियोजन नीट नाही. पाणी वेळेत, शेतकऱ्यांच्या गरजेप्रमाणे सोडले जात नाही. बांधापर्यंत त्यांचे कालवे, पोटपाट नाहीत. या पाण्याची कसलीही हमी नसते. निवडणुका आल्या की ते सोडले जाते. त्यामुळे ते पाणी ओढ्या ओघळींनी वाहत जाते.

आज जे काही बागायत क्षेत्र दिसते ते शेतकऱ्यांनी स्वतःच्या हिमतीवर केले आहे. कर्जे काढून त्याने विहीरी, कूपनलिका, पाणी योजना राबविल्या आहेत. ठिबक करून त्याचेच क्षेत्र वाढविण्याचे उद्योग सुरु आहेत.

### क्षारयुक्त पाणी शेतीला

आज सर्व गावातील, शहरातील सारे सांडपाणी हे ओढे, नाले, नद्यात सोडले जात आहे. त्यामुळे मिळणारे पाणी जादा क्षारयुक्त आहे. नद्यांची जी अवस्था आहे तीच कूपनलिका वा विहीरीतील पाण्याची आहे. पूर्वी ज्या पाण्याच्या हार्डनेस १२० असायचा ते पाणी आता ४०० ते ४५० हार्डनेसचे मिळत आहे. एवढे क्षार वाढलेल्या पाण्याने जमिनींचे आरोग्य कसे नीट राहणार? त्यामुळे जमीनी गतीने क्षारपड होत आहे. तिथे खुरटी झुडपे उगवत आहेत.

### जिराईत शेती असून नसल्यासारखी

शेतीला पाणीच नसल्याने ८० टक्क्यांच्यावरची शेती ही जिराईत आहे. पूर्वी जिराईत शेतीत देखील जगण्यापुरते उत्पन्न यायचे. आता ते येत नाही. ग्लोबल वॉर्मिंगचा सर्वात मोठा धक्का हा जिराईत शेतीला बसलेला आहे. त्यामुळे सारे निसर्ग चक्र विस्कटून गेलेले आहे. हा फटका मानव मिर्नित आहे. त्यामुळे मृगाला पाऊस पडेल याची खात्री नाही, म्हातारा, हत्तीचा पाऊस पडेल की नाही हे सांगता येत नाही. पाऊस माळेत सापडण्याची हमी नाही. आद्रा कोसळतील की नाही हे माहित नाही. त्यामुळे सारी जिराईत शेती अडचणीत आहे. पावसाच्या लहरीपणाने खरीप हंगाम जातो तर थंडी कमी झाल्याने, जवळजवळ थंडी नसल्यानेच रब्बी हंगाम वाया चालला आहे.

त्यामुळे एक कुटूंब जगेल एवढे उत्पन्न या शेतीतून मिळत नाही. त्यातून शेतकऱ्यांची फरफट सुरू आहे. एकेका शेतकऱ्याला ३० ते ४० एकर शेती आहे. परंतु तिथे कुसळांशिवाय काहीही पिकू शकत नाही. त्यामुळे ती असून नसल्यासारखी आहे. ठेवावी तर परवडेना, विकावी तर सारेच निसटून जाते आहे, अशी तिची अवस्था आहे. यात एक महत्त्वाचे की ही शेती सध्या पिकत नाही म्हणून विकणे हा पर्याय नव्हे. ती तुमची ठेव पावती आहे. त्याची चोरी होत नाही. जमीनीचे दर वर्षाला वाढत आहेत. त्यामुळे अप्रत्यक्ष तुमचे उत्पन्न वाढत आहे. तुमची मालमत्ता वाढत आहे. त्याचा आता उपभोग घेता येत नाही ही अडचण आहे.

### राज्यकर्ते-नोकरदारांचे साटेलोटे

सरकारमध्ये अजूनही काही चांगली मंडळी आहेत. ती शेती व शेतकऱ्यांसाठी वेगवेगळ्या योजना आखत आहेत. शेतकरी अडचणीत आहे, तो सुधारला पाहिजे असे त्यांनी प्रामाणिकपणे वाटत आहे. परंतु सारेच त्या भूमिकेचे नाहीत. उलट राजकारणी, सरकारी अधिकारी, कार्यकर्ते व नोकरदार या योजना मध्येच लाटत आहेत. आता जाणीवपूर्वक तशाच योजना तयार केल्या जात आ-हेत. अधिकारीच नेत्यांनी कसा प्रस्ताव पाठवायचा ते सांगतात व दोघे मिळून तो पैसा लाटतात. साऱ्या योजनांना झिरपणी आहे. त्याचे लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाहीत.

### दर्जाहीन खते, औषधे, बियाणी

आज शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणी मिळत नाहीत. दर्जेदार औषधे मिळत नाहीत. दर्जेदार खते मिळत नाही. कितीही चांगले नाव असलेल्या कंपनीचे बियाणे घ्या, किंवा सरकारी महामंडळाचे बियाणे घ्या, तुम्हाला त्याची हमी मिळणार नाही. त्याची उगवणक्षमता चांगली नसते. त्या जुने बियाणे मिसळलेले असते. बीजप्रक्रिया नीट झालेली नसते त्यामुळे त्याच्या उगवन क्षमतेची हमी देता येत नाही. काही वेळा फसगत होते.

पान ६ वर ▶

▶ पान ५ वरून

शेकडो एकरात बियाणे उगवत नाही. जादा ओरड केल्यावर त्याचा खर्च तेवढा मिळतो. तुमचे जे वर्षाने नुकसान झालेले असते ते मिळत नाही. कोणताही दुकानदार कसली खात्री देऊ शकत नाही.

औषधांची स्थिती तीच आहे. भरमसाठ दर देऊनही त्यांचा दर्जा

# शेतीला नव्या प्रश्नांचा गराडा

चांगला नसतो. असली औषधे फवारून पैशापारी पैसा खर्च होतो व उत्पन्न देखील घटते. खतांची स्थिती याहून वेगळी नाही. रासायनिक खतांचे दर वाढले आहेत. सेंद्रिय खते विकत घेणे म्हणजे केवळ मातीच विकत घेणे आहे.

## यावर नियंत्रण नाही.

या सर्व यंत्रणेवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारी यंत्रणा आहे. पण ती सारी भ्रष्ट आहे. त्यांना पैसे दिले की खतांतील ते वाटेल त्या घटकांची प्रमाणपत्रे मिळतात.फसगत करणाऱ्यांवर कारवाई होत नाही. या कंपन्या व व्यापाऱ्यांनी ओळख-लेले आहे. त्यामुळे भेसळ करणाऱ्यांचे फसविणाऱ्यांचे फावते आहे. त्यातून प्रचंड कमाई केली जात आहे. इकडे प्रत्यक्षात मात्र शेतात उत्पन्न घटत आहे. त्याचा फटका केवळ शेतकऱ्याला बसतो आहे.

## उत्पादन खर्च वाढला

महागाईमुळे शेतीचा उत्पादन खर्च वाढला आहे. वीस वर्षात तो तीनपट, चारपट झाला आहे. नांगरटीपासूनच त्यांची सुरुवात होते. आता बैलांची संख्या घटली आहे. त्यामुळे पूर्वी पैसा खर्च न करता होणारी नांगरट आता ट्रॅक्टरने भाड्याने करावी लागते. तसेच फणणे, कुळवणे साऱ्यांना ट्रॅक्टर लागू लागला आहे. मळणी यंत्रावर होते आहे. खते, बियाणे, औषधांचा खर्च वाढला आहे. पूर्वी पारंपारिक बियाणे होती. आताची बियाणी दरवर्षी विकत घ्यावी लागत आहेत. मजुरीच्या दरात वाढ झाली आहे. त्यामुळे भांगलण, खुरपणी, काढणी, मळणी यासाठीचा मजुरीचा दर वाढला आहे.

एका बाजूला उत्पादन खर्च वाढतो आहे. दुसऱ्या बाजूला उत्पादन घटत आहे. त्याला दर मिळत नाही.

व्यापारी, साखर कारखानदार, दूध डेअऱ्यांत काटामारी केली जाते. त्याचा मोठा फटका शेतकऱ्याला बसतो आहे.

लाच दिल्याशिवाय काम नाही.आज शेतकऱ्याचे कोणतेही काम लाच दिल्याशिवाय होत नाही. महसूल विभागात कोणताही कागद लाच दिल्याशिवाय हालत नाही. वडिलार्जित शेती मुलाच्या नावावर करायची असली तरी देखील तलाठ्याला लाच द्यावी लागते. पाणी परवाना, उतारे साऱ्यासाठी पैसे मोजावे लागत आहेत. काही कर्ज मंजुरीसाठी बँका अधिकारी, सोसायटी अध्यक्ष, सचिवाला पैसे द्यावे लागत आहेत. म्हणजे शेतकऱ्याला लाच देखील १२ ते १३ टक्के दराने कर्ज काढून द्यावी लागत आहे.

## व्यापाऱ्यांची फसवणूक

इतके वर्ष ओरड करूनही व्यापाऱ्यांच्या फसवणुकीत फरक पडत नाही. नवे धान्य आले की त्याचे दर पडतात, हा आता नित्य नियम आहे. वर्षानुवर्षे हे चालत आहे. त्यात काडीचाही फरक पडत नाही. शेतकऱ्यांनी विकलेला माल व ग्राहकांच्या पदरात पडणारा माल त्याच्यामध्ये मोठी तफावत आहे. ती किमान दीडपट, दुप्पट आहे. यातून व्यापारी गब्बर होतात व शेतकऱ्यांना तसेच ग्राहकांना त्याचा आर्थिक फटका बसतो. यावर उपाय म्हणून बाजार समित्या निघाल्या. त्याही व्यापारी धार्जिण्या आहेत. शेतकऱ्यांपेक्षा व्यापाऱ्यांचे हीत त्या जपत आहेत.

## खर्चाएवढे उत्पन्न नाही

शेतीत जेवढा उत्पादन खर्च येतो तेवढे उत्पन्न देखील निघत नाही, अशा घटना अनेक वेळा घडतात. जिराईत जमिनीत कोणतीच पिके परवडत नाहीत. ज्वारी, शेंग, गहू, हरभरा ही पिके उत्पादन खर्च देखील काढू शकत नाहीत. जिथे पाण्याची सोय आहे तिथे ऊस, हळद, द्राक्ष, डाळींब, भाजीपाला, केळी अशी बोटावर मोजणारी पिके चार पैसे मिळवून देत आहेत. त्यातही उत्पादन खर्च वाढतो आहे. नफा कमी होतो आहे. चांगले उत्प-ादन झाले, तरच आज शेती परवडत आहे. नाहीतर केवळ तोंडमिळवणी होत आहे. आजच्या बोगस खते, बियाणी, औषधे व क्षारयुक्त पाण्याने काहीही साध्य होत नाही.

## रोजगारी टेचात

आज शेतकऱ्यांपेक्षा रोजगारी, मजूर टेचात आहेत. पती-पत्नी व दोन मुले घरी धरली व तिघे मजुरीला शेतात गेली तरी रोज २५० ते ३०० रुपये घरात येतात. महिन्याला त्या घरात ७५०० रूपये येत आहेत. असा रोजचा किंवा महिन्याला पैसा शेतकऱ्याला कधीच मिळत नाही. भाजीपाला फिरून विकणे याला केवळ अपवाद आहे. मजूर आज वेगवेगळ्या पद्धतीने पैसा मिळवीत आहेत. कधी अंगावर कामे घेऊन जादा पैसा मिळवीत आहेत. कधी दिवसा, रात्री काम करीत आहेत. अनेक शेतकरीच शेतमजूर आहेत. पण प्रतिष्ठेचा मुद्दा करून जे घरात बसतात त्यांची मोठी आर्थिक ओढाताण होत आहे.

## केवळ शेती परवडत नाही

आज केवळ शेती परवडत नाही. घरातील एखादा नोकरीला, दुसरा शेतीत व त्यांच्यात समन्वय असेल तर शेती परवडू शकते. तसेच कार्पोरेट कंपन्या आता वेगवेगळ्या उद्योगात, व्यवसायात शिरल्या आहेत. एकाच मालकाच्या चार-पाच कंपन्या असतात. तसेच शेतकऱ्यांने एका वेळी पूरक चार उद्योग केले पाहिजेत. सध्या दुधाचा व्यवसाय सर्व शेतकरी करीत आहेत. या व्यवसायाने त्याला खऱ्या अर्थाने तारले आहे. तरीही दूध दर कमी देणे, फॅट मारणे, मशीन ॲडजेस्ट करणे, फॅटसाठी मापाने दूध घेणे, हे प्रकार थांबणे गरजेचे आहे. दुधाबरोबरच कोंबडी पालन, विशेषत: बॉयलर कोंबडी पालन, कधी मजुरी, कधी बैलगाडीचे भाडे करणे, कधी बैलजोडी भाड्याने नेणे अशी कामे केली पाहिजेत. वायरमन, गवंडीकाम, शिवणकाम, असले घरगुती उद्योग पूरक म्हणून केले पाहिजेत. चांगली आर्थिक स्थिती असेल तर भाडे करण्यासाठी हौदाचा टेम्पो, ट्रॅक्टर, टेम्पो, जेसिबी, जमिनी सपाटीकरणासाठी ट्रॅक्टर अशी यंत्रे घेऊन त्याचा वापर चार पैसे मिळविण्यासाठी केला पाहिजे.

## नोकरदार मुलांची पाठ

शेतकऱ्याला सध्या सर्वात जास्त फटका हा नोकरदार मुलांपासून बसला आहे. घरातील बाकी सर्वांनी शेतात राबून याला शिसवलेले असते. तो पुढे नोकरी लागल्यावर काही तरी मदत करेल व घरातील एखादा भार स्वत:च्या खांद्यावर घेईल. मात्र अपवाद वगळता सारी शेतकऱ्यांची मुले शहरात नोकरीसाठी राहिली आहेत. विवाहापूर्वी चार पैसे त्यांनी दिले असतील. परंतु त्यानंतर त्यांनी घराकडे पाठ फिरवली आहे. आपली पत्नी, आपली मुले आपला प्रपंच यातच ते मशगूल आहेत. चांगला पैसा मिळून देखील तो त्यातील काहीही घरी देऊ शकत नाही. त्याला इच्छा असूनही घरी देऊ दिला जात नाही. जमीन, घरातील वाटणीला मात्र तो आघाडीवर असतो. आपले चांगले आहे म्हणून तो जमीन गावातील भावाला देत नाही. त्याला काही अपवाद असतील.

आत्ता आत्ता काही नोकरदारांना शेतीचे महत्त्व पटू लागले आहे. किंवा आता केवळ नोकरीतही भागेनासे झाले आहे. त्याम ुळे गरज म्हणून तो शेतीकडे वळू लागला आहे. तिथे गुंतवणूक करू लागला आहे. उत्पादन घेण्यास मदत करू लागला आहे.

## राहणीमान वाढले

शेतकरी सर्वात अडचणीत येण्याचे कारण उत्पादनातील घट, चांगला दर नसणे ही आहेतच. त्याचबरोबर राहणीमान वाढले हे देखील महत्त्वाचे कारण आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यातून अनेक नव्या वस्तूंचा, साधनांचा मारा आज होत आहे. त्यातून नव्या सुविधा गावापर्यंत पोहोचल्या आहेत. त्या सगळ्या महिन्याला तुमचा खिसा रिकामा करीत आहेत. त्यातून खर्च वाढला आहे. टीव्ही, केबल, फोन, मोबाईल, वीज, दुचाकी, चारचाकी, इनव्हर्टर, केबल, संगणक या वस्तू खर्च करण्यास पैसा लागतो. पुढे त्यासाठी महिन्याला पैसे मोजावे लागतात. विजेचा खर्च तरी वाढतो आहे. याशिवाय कपडे, भांडी, प्रवास, चपला, महिलांची श्रृंगार साधने यासाठी पूर्वीपेक्षा कितीतरी पट पैसा लागू लागला. आता दिवसाची सुरुवात खर्च करूनच होत असते. पूर्वी राखुंडी किंवा तंबाखूच्या मिश्रीने दात घासले जात असत. त्यासाठी पेस्ट व ब्रश लागू लागला आहे. झोपताना डास वाढल्याने मच्छर हटाव अगरबत्ती पेटवावी लागते. अगदी कलप करण्यासाठी सुद्धा महिन्याला ३०ते४० रुपये खर्च करावे लागत आहेत. आता बलुतेदारी बंद झाली आहे. त्यामुळे प्रत्येक कामाला रोख पैसे मोजावे लागत आहेत. हा खर्च शेतकऱ्यांच्या अंगाशी येऊ लागला आहे. आज शहरी व ग्रामीण राहणीमानात विशेष फरक उरलेला नाही. पूर्वी या खर्चात मोठी तफावत असायची. आता जवळपास तेवढाच खर्च येत आहे. एका कुटूंबाचा महिन्या किमान खर्च दहा हजार रूपये आहे. म्हणजे वर्षाचा खर्च एक लाख वीस हजार रूपये झाला आहे.

म्हणजे शेतीतून वर्षाला एवढा नफा मिळाला पाहिजे. तो मिळाला तर त्या कुटूंबाचा चरितार्थ चालेल. आज पाच एकर शेतीतूनही एवढा नफा मिळत नाही. मग भागणार कसे? शिवाय हा खर्च केवळ जगण्याचा आहे. सण, उत्सव, समारंभ, मुलांचे शिक्षण, विवाह, देणीघेणी, पै-पाहुण्यांचे रितीरिवाज यासाठी वेगळी पैशाची तरतूद लागते.

## सारेच कर्जबाजारी

या खेळात आज सारीच शेतकरी कुटूंबे कर्जबाजारी आहेत. निष्कर्ज माणसे केवळ गावात बोटावर मोजणारी आहेत. जिराईत छोट्या कर्जदार आहे, तर बागाईतदार मोठा कर्जदार आहे. नोकरदार देखील कर्जाच्या खाईत आहेत. काहींना सावकारी कर्ज काढावे लागते. ते महिन्याला चार ते दहा टक्के, माणूस त्याची गरज बघून असते. त्यातून तो उभा राहू शकत नाही.

## आत्महत्येची वेळ

घर व शेतातील खर्चाचे अर्थशास्त्र ज्यांना जमले नाही त्यांची सतत कोंडी होते. तो मग गरजा भागवण्यासाठी आणखी कर्ज उचलतो. कधी सावकाराकडे जातो. त्याच्याकडे गेले की काही दिवसात त्याला घर वा जमीन विकायची वेळ येते. सावकारच ती व्याज व मुद्दलात घेणार असतो. पुढे फुकापासरी जमीन जाते. ज्याचे जमिनीवर प्रेम आहे. त्याला ती बँक व सावकाराच्या घशात जाऊ नये वाटते. तरीही त्याला दुसरा मार्ग उरत नाही. त्याला मोठी निराशा येते. त्यातून स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी तो आत्महत्या करतो. सध्या ही मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होत आहेत. आता ते साऱ्यांच्या सवयीचे झाले आहे.माणसाच्या मरणाला काही मोल उरलेलेच नाहीत. वर्षात लाखावर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असतील. त्याचे सरकार, राजकारणी, जनता व तुम्ही-आम्ही कोणालाच काही वाटत नाही. आपण सारे बधीर झालो आहोत.

# सहकाराचे वर्तमान आणि भविष्य संकटात

ज्या महाराष्ट्रांने सहकाराचं वैभव अभिमानाने मिरवलं त्याच महाराष्ट्रातील उद्ध्वस्त केल्या जाणाऱ्या सहकाराची शकलं पाहता सहकारी साखर कारखान्यांचं हे अल्पचरित्र पूर्ण व्हायला आता वेळ लागणार नाही, असे चित्र दिसत आहे. विनासहकार, नाही उध्दार हा मूलमंत्र घेऊन महाराष्ट्रात सहकाराच्या चळवळीचं बीज रोवलं गेलं. ध्येय, तत्व यांची सांगड घालून एक अख्खी पिढी त्याच्या वाढीसाठी जोमाने कामाला लागली. आणि बघता बघता एका वटवृक्षात त्याचे रूपांतर झाले. सहकाराला गौरवशाली इतिहास अभिमानास्पद असला तरीही आज त्याचा वर्तमान आणि भविष्य संकटात सापडलेला आहे.

राज्यात गेल्या सहा दशकांत सहकारी साखर कारखान्यांची संख्या २०२ वर जाऊन पोहोचली. त्यापैकी आज १६१ कारखान्यांची उभारणी पूर्ण झाली आहे. मात्र यातील केवळ १११ साखर कारखानेच गेल्या गळीत हंगामात चालू आहेत, तर उर्वरीत ५० साखर कारखाने गेल्या काही वर्षात वेगवेगळ्या कारणांनी बंद पडले आहे. त्यामुळे बंद पडलेल्या साखर कारखान्यांपैकी ३१ साखर कारखाने दिवाळखोरीत काढून सिक्युरिटायझेशन ॲक्टनुसार त्यांच्या विक्रीला सुरवात केलीय. यापैकी १२ साखर कारखान्यांची विक्री पूर्ण झाली आहे. सहकारातले कारखाने विक्री करण्याच्या सरकारच्या या धोरणांविरोधात आज अनेक ठिकाणी आवाज उठतो आहे. कारखान्यांची विक्री झाल्यानंतर शेतकऱ्यांचा कारखान्यावर कोणताही अधिकार राहणार नाही. त्यामुळे भविष्यात प्रत्येक गोष्टीसाठी त्याला कारखाना विकत घेणाऱ्या भांडवलदाराच्या हाताकडे बघावं लागणार आहे. सहकारी साखर साखर कारखान्यांची विक्री करण्याच्या सरकारच्या धोरणाबाबत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी रोखठोक भूमिका घेतलेली आहे. ते म्हणाले की, कारखान्यांची ही विक्री म्हणजे सहकार चळवळ नष्ट करण्याचा सरकारचा डाव आहे. कारखाना विक्री केल्यानंतर कारखान्यावरील सभासदांचा हक्क मोडीत निघणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालकीचे साखर कारखाने विकून त्याला गुलामं करण्याचं काम सध्या सरकारकडून सुरू आहे. शिवाय कारखान्यांची विक्री करून बँका आधी आपले पैसे सोडवून घेत आहेत. परंतु आपल्या पोटाला चिमटा काढून ज्यांनी कारखाना उभारला ते शेतकरी आणि कारखान्यांवर राबणाऱ्या कामगारांना मात्र वाऱ्यावर सोडून दिले जात आहेत. एकूणच सहकातले कारखाने विकून शेतकरी आणि कामगार यांना देशोधडीला लावण्याचं काम सत्ताधाऱ्यांकडून सुरू आहे. अर्थात खा. शेट्टी यांनी आधी शेतकरी आणि कामगारांचे पैसे द्या आणि नंतरच बँकांचे, अन्यथा याविरोधात रस्त्यावर उतरू, असा थेट इशारा सरकारला दिला आहे.

व्यवस्थापनातील त्रुटी, निर्णयक्षमेतचा अभाव, निर्णयप्रक्रियेतला विलंब, उसाचा भाव, सरकारचं साखरेच्या आयात आणि निर्यात संदर्भातील धोरण, उसाची उपलब्धता, भ्रष्टाचार आणि सर्वात महत्वाचं म्हणजे ध्येय, निष्ठा, मूल्यांचं अधःपतन अशी अनेक कारण कारखाने बंद पडयला जबाबदार आहेत. सरकारला हे माहिती नाही असं नाही. वेळोवेळी नेमलेल्या अनेक तज्ज्ञांच्या समितींनी त्यांच्या अहवालातून सांगितले आहे. शिवाय ते कशा पध्दतीने टाळता येईल हे सुध्दा सांगितल आहे. परंतु सरकारने अक्षम्य दुर्लक्ष केले आहे. परिणामतः आज कारखाने धडाधड बंद पडत आहेत. विक्रीला काढलेल्या कारखान्यांचा बारकाईने अभ्यास केल्यास यातील बहुतांश कारखाने हे भ्रष्टाचार आणि संचालक मंडळाच्या चुकीच्या धोरणांमुळे दिवाळखोरीत निघाल्यांच दिसतं. सहकारातली मूल्य, निष्ठा आणि ध्येय नावालाच उरले आहे. सहकाराच्या मूळ उद्देशालाच आज हरताळ फासला जात आहे. सहकारात काम करणाऱ्या आजच्या पिढीच्या काही नेत्यांना सहकार ही आपल्या वडिलांची जहागिरी असल्याचा भास होतोय. त्यातून होणारा मनमानी कारभार सुरू आहे. त्यामुळे चुकीच्या धोरणांमुळे कारखाना दिवाळखोरीत गेला, ज्यांनी तो मोडून खाल्ला त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. चौकशी समिती स्थापन होते. तिच्या अहवालावर पुन्हा दुसरी चौकशी समिती नेमली जाते. अनेक वर्षे चौकश्याचं हे सत्र सुरूच असतं. पाकीट मारणाऱ्याला या देशात काहीतरी शिक्षा होते, परंतु सर्वसामान्यांचे कोट्यवधी रूपये लुटणारे दरोडेखोर मात्र कायद्यातल्या पळवाटांचा फायदा घेऊन सहीसलामत सुटतात, हा कुठला न्याय?

कारखान्यांना परवानगी देण्यापासून तो विक्री करण्यापर्यंत सगळा सावळा गोंधळ सुरू आहे. जिथे कापूस पिकतो तिथे कारखाने उभारले जातात आणि जिथे ऊस पिकतो तिथे सूतगिरण्या उभारल्या जातात. साहजिकच काही दिवसांतच बंद पडतो. मग ऊस उपलब्ध नव्हता असं कारण दिलं जातं. आता प्रश्न आसा निर्माण होतो की, जर ऊस उपलब्ध नाही तर तिथे कारखाने काढायला परवानगी कोणी आणि कशी दिली? आजा ते कारखाने बंद पडले आहेत त्याची जबाबदारी देणाऱ्याचीदेखील नाही का? आणि ज्या संचालक मंडळाच्या गलथान कारभारामुळे, कारखाने मोडीत निघाले, त्यांची जबाबदारी राहत नाही का? शेतकऱ्यांच्या मालकीच्या कारखान्यांनवर जप्ती आणणाऱ्यांनी संचालक मंडळाला जबाबदार धरून त्यांच्या संपत्तीवर जप्ती का आणू नये?

**लोकप्रभा साभार**

# यंदा ऊस दरात घट : एफआरपी चा परिणाम

**जयसिंगपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा):** यंदाच्या हंगामात साखरेचे उतरलेले दर नि शासनाने उसावर लागू केलेली एफ आरपी यामुळे यावर्षीच्या येणाऱ्या हंगामात उसाच्यादरावर परिणाम होणार आहे. शरद पवार यांनी लागू केलेली एफआरपी आता हळूहळू शेतकऱ्यांच्या मनगुटीवुर येऊन टेपणार आहे.

शासनाने यंदा ९.३० टक्के रिकव्हरीला १३९.०२ रूपये प्रकि क्विंटल लागू केलेली आहे. ९.३० टक्क्याच्या पुढील एक टक्क्यास १४६ रूपये लागू करण्यात आलेले आहेत. त्यातच साखर नियंत्रणमुक्त करण्याचे धोरण शासनाने अवलंबले आहे. लेव्हीची १० टक्क्यांवरून २० टक्क्यांवर नेलेली आहे. एफआरपी वर जादा दर दिल्यास ३५ टक्के करही लागू करण्यात आलेली आहे. तसेच सभासद फी ५हजारांवरून १० हजार करण्यात आलेली आहे. त्यामुळे हे चित्र पाहता यंदा उसाला दर किती मिळणार हे काही सांगता येणार नाही. एसएमपीचे सूत्र आणि एफआरपीचे सूत्र यामध्ये खूप मोठी तफावत आहे. एसएमपीला जसा कायद्याचा आधार होता तसा एफआरपीला कायद्याचा कोणताही आधार राहिलेला नाही. त्यामुळे यंदा ऊस दरासाठी रस्त्यावर उतरावे लागणार हे मात्र निश्चित!



# आणखी एक कारखाना जयंत पाटलांच्या घशात

**नागपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा)** : ब्रॉयडी ॲण्ड कंपनी या खासगी कंपनीकडून सहकार क्षेत्राने विकत घेतलेल्या गंगापूर सहकारी साखर कारखान्याची विक्री झाली. ग्रामविकास मंत्री जयंत पाटील यांच्या राजाराम फुडस् प्रा. लि. या कंपनीने २९ कोटी रूपयांना हा कारखाना विकत घेतला. मुबलक पाणी आणि उसाची कमतरता नसलेला व शंभर कोटींहून अधिक मालमत्ता असलेल्या या कारखान्याची विक्री पाहिल्यानंतर सहकार चळवळ शेवटचे आचके देत आहे, असे वाटत आहे.

ग्रामविकास मंत्री जयंत पाटील यांना साखर कारखानदारीत आपली पाळमुळे खोलवर रूजवण्यास सुरवात केली आहे. सर्वोदय नंतर गंगापूर सहकारी साखर कारखाना ना. जयंत पाटील यांनी विकत घेतला असला तरी साखर कारखाना मोडीत काढणे आणि स्वतःच्या स्वार्थासाठी कारखाना विकत घेऊन त्याचे खासगीकरण करणे ही बाब सहकाराला निश्चितच मारक ठरणारी आहे. सध्या राज्यात एकूण ११२ सहकारी साखर कारखाने तोट्यात आहेत. हे तोट्यातील साखर कारखाने अवसायनात काढून गब्बर साखर सम्राट कारखाना विकत घेण्याचे प्रकार वाढले आहेत. सहकार क्षेत्रातील मराठवाड्याचे धुरंधर नेते कै. बाळासाहेब पवार यांनी स्थापन केलेल्या कारखान्यांपैकी तीन कारखान्यांची विक्री होणार आहे. गंगापूर साखर कारखान्याची विक्री झालीच, पण केंद्र सरकारच्या बॅंकींग अंतर्गत असलेल्या सेक्युरिटायझशेन ॲक्ट २००२ च्या कायद्यानुसार कन्नड साखर कारखान्याची विक्री सुरू झाली आहे, तर जालना कारखान्याची जप्ती होऊन आता विक्री होणे बाकी आहे. गंगापूर कारखान्याचे मुद्दल कर्ज १५ कोटींचे होते. पण व्याजाचा फुगवटा होऊन ते ४० कोटींपर्यंत पोहोचले. २००१ पासून तर कारखान्याचा बॅंकेशी व्यवहारही नाही. वस्तुतः २००७ पासून हा कारखाना माढ्याच्या विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याने घेतला, पण धड चालवला नाही. त्यांच्याकडून दहा कोटी रूपयांचे येणे असून त्याबद्दल साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली निर्माण केलेल्या लवादाने गेल्या अडीच वर्षांपासून काहीही निर्णय घेतला नाही. मुळामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील साखर सम्राटांच्या नजरेत हा कारखाना भरला होता आणि त्यांनी तो विकत घेतला.

एका बाजूला साखर कारखानदारीवर पश्चिम महाराष्ट्रातील पुढारपण पोसले जात असताना या घडीला मराठवाड्यात साखर कारखान्यांची अनेक ठिकाणी विक्री, जप्ती चालू आहे. वैजापूरचा विनायक सहकारी साखर कारखाना अवसायानात निघाल्याचे सहकार खात्याने अगोदरच जाहीर केले आहे. पैठणचा संत एकमाथ सहकारी साखर कारखाना दिवाळखोरीत निघाल्यानंतर भाजपचे नेते गोपीनाथ मुंडे यांनी भाडेतत्वावर घेतला आणि तीन वर्षांपासून तो फायद्यात चालू आहे. याच पध्दतीने परभणीतील गोदावरी, मराठवाडा, भोकरमधील वाघलवाडाचा शंकर सहकारी या कारखान्यांची जप्ती प्रक्रिया सुरू झाली आहे. बागेश्वरी, शेतकरी विकास, नरसिंह, या कारखान्यांची जप्ती या अगोदरच झाली आहे. औरंगाबाद तालुक्यातील देवगिरी कारखानासुध्दा फारशा चांगल्या अवस्थेत नाही.

एकेकाळी मराठवाड्याची शान असलेला तेरणा सहकारी साखर कारखाना बंद आहे. किल्लारी सहकारी साखर कारखाना कामगारांच्या प्रश्नाने ग्रासलेला असून गेल्या अनेक वर्षात या कारखान्याचे फक्त अध्यक्ष बदलले पण परिस्थिती दिवाळखोरीचीच राहिली. मात्र जे या कारखान्याचे अध्यक्ष झाले ते आमदारकी मिळवून दिवाळी केली.

मुबलक पाणी आणि ऊस असलेले गंगापूरसारखे कारखाने दिवाळखोरीत जाऊच शकत नाही. उसाच्या चिपाडापासून प्रत्येक गोष्टीतून पैसा उभारला जातो. पण पुढारपणाच्या झोकात व्यवस्थापन हरवल्यामुळे मराठवाड्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा हा कणा मोडून पडला आहे. कन्नड आणि किल्लारी हे कारखाने कामगारांच्या प्रश्नांमुळे बंद पडले. ज्या ठिकाणी मुबलक पाणी, ऊस आणि सुबत्ता आहे, त्या ठिकाणी प्रचंड प्रतिकूलता आहे ते कारखाने मात्र अजूनही टिकून आहेत. एका बाजूला राज्यातील अनेक साखर कारखाने आजारी पडत असताना काही भांडवलदार राजकारणी (जयंत पाटलांसारखे) कारखाने विकत घेण्याचा सपाटा लावण्याचा प्रयत्न सुरू आहे. जालना सहकारी साखर कारखानाही जप्तीच्या स्थितीत आहे. मराठवाड्यातील सहकारी साखर कारखाने मोडकळीस येणे हे ऊस पळविण्याच्या दृष्टीने शेजारच्या पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांना उपकारक ठरते. तसेच उसाच्या कारखानदारीपेक्षा बीडसारख्या जिल्हा ऊस तोड मजुरांचा कारखाना म्हणून टिकून राहणे फायद्याचे आहे. काही नेते सहकाराला मूठमाती देऊन स्वतःची तुंबडी भरवून घेण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. शेतकऱ्यांची मालकी काढून घेऊन स्वतःची मालकी घुसवण्याचा प्रयत्न राज्यातील अनेक सहकारी साखर कारखान्यात सुरू आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने ही गोष्ट अतिशय घातक आहे.



# राज्यातील पावसाचे प्रमाण कमी होणार

**पुणे (स्वाभिमानी वृत्तसेवा)** : गेले चार दिवस राज्यात बहुतेक ठिकाणी हजेरी लावल्यानंतर येत्या आठवड्यात मध्य भारतासह महाराष्ट्रातील पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता भारतीय हवामनाशास्त्र विभागाने (आयएमडी) वर्तवली आहे. सध्या मुंबईसह कोकणात चांगला पाऊस होत आहे. मात्र, पुढील आठवड्यात पश्चिम किनारपट्टी सोडून इतरत्र पावसाचे प्रमाण तुलनेने कमी राहणार असल्याचे आयएमडी ने म्हटले आहे.

जुलै सुरू होताना राज्यात मध्य महाराष्ट्राचा काही भाग सोडून इतरत्र पावसाने पुनरागमन केले. पावसाचा जोर कोकण सोडून इतरत्र जास्त नसला, तरी त्याने सर्वदूर हजेरी लावल्याने दुबार पेरणीचे संकट टळले. बंगालच्या उपसागरात योग्य ठिकाणी कमी दाबाचे क्षेत्र हंगाम सुरू झाल्यापासून सुरू झालेले नसल्याने महाराष्ट्रात अजूनही संततधार अनुभवयास मिळालेली नाही. त्यातच निर्माण झालेली कमी दाबाची क्षेत्रे मध्य प्रदेशच्या दिशेने सरकल्याने राज्याच्या अंतर्गत भागात पाऊस सक्रिय होण्याची शक्यता मावळली. त्यामुळे ढग चांगले असूनही चांगला पाऊस होत नसल्याचे आयएमडीने म्हटले आहे.

पुढील पाच दिवसांसाठी देण्यात आलेल्या अंदाजामध्ये महाराष्ट्र, मध्य आणि दक्षिण भारतातील पावसाचे प्रमाण कमी होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. यात प्रामुख्याने मॉन्सूनचा पूर्व - पश्चिम कमी दाबाचा पट्टा सध्या उत्तरेकडे सरकल्यामुळे उत्तर भारतातील पावसाचे प्रमाण या कालावधीत वाढणार आहे.

एक जून ते आठ जुलै या कालावधीत देशातील ३६ भौगोलिक विभागांपैकी २५ विभागांमध्ये सरासरीएवढा किंवा त्यापेक्षा अधिक पाऊस झाला आहे. तर, विभागात तो सरासरीपेक्षा कमी आहे. मागील दुष्काळी वर्षात हे आकडे उलटे असल्याचे दिसून येते. त्या कालावधीत फक्त ११ विभागांत सरासरीएवढा पाऊस झाला होता. राज्याचे चित्र पाहिल्यास एक जूनपासून विदर्भात २६१ मिलि. पाऊस झाला असून, तो या कालावधीत सरासरीपेक्षा ७ टक्क्यांनी जास्त आहे. हेच प्रमाण कोकण ८९५ मिलि, मध्य महाराष्ट्र २३४ मिलिमिटर असे पावसाचे प्रमाण आहे.



# भाज्यांची आवक घटली





***जयसिंगपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा) :*** *पावसाळा सुरू होताच येथील बाजारपेठातील विविध भाज्यांची आवक कमी झाली असून आवक असलेल्या सध्याच्या भाज्यांचे दर कमालीचे वाढले आहेत. कडधान्यापासून ते थेट जीवनावश्यक वस्तूंपर्यंत साऱ्या वस्तूंच्या वाढलेल्या दरामुळे झालेल्या महागाईने मेटाकुटीस आलेल्या सर्वसामान्यांना वाढलेल्या दरामुळे भाज्याही खाणे मुश्किल झाले आहे.*

*पावसाळ्याच्या तोंडावर समुद्रातील मासेमारीला कायद्याने बंदी लागू झाल्याने समुद्रातील मासेमारी बंद आहे. त्यामुळे खाडीभागात तसेच नदीकिनाऱ्यावरून मासेमारी केली जात आहे. त्यामुळे दुसरीकडे मासळीचे दरही भरमसाट वाढले आहेत. त्यामुळे रोजच्या जेवणात भाजीशिवाय पर्याय उरलेला नाही. गेल्या काही महिन्यांपासून बाजारातील जीवनावश्यक वस्तूंपासून चैनीच्या वस्तूंपर्यंत साऱ्याच वस्तूंच्या दरामध्ये झालेल्या कमालीच्या वाढीने सर्वसामान्यांचे पुरते कंबरडे मोडले आहे. जीवनावश्यक वस्तूंपासून चैनीच्या वस्तूंपर्यंत सर्वच वस्तूंचे दर गगनाला भिडल्याने सर्वसामान्यांना जगणे नकोसे झाले आहे. सध्या पावसाचे दिवस असल्याने भाजीही कमी झाली आहे. तसेच पावसामुळे वाहतुकीवरही परिणाम होत आहे. कोबी, फ्लॉवर, टोमॅटो, कोथींबिर, मिरची आदी वस्तूंचे दर पावसाळ्याच्या तोंडावर कमालीचे वाढले आहेत. त्यामुळे वाढलेल्या या महागाईमध्ये सर्वसामान्यांना भाज्याही खाणे जिकरीचे झाले आहेत.*

*एका बाजूला नियमित बाजारातील भाज्यांचे दर कमालीचे वाढल्याने सर्वसमान्य पुरते मेटाकुटीस आलेले असताना आठवडा बाजारामध्ये विक्रीला असणाऱ्या भाज्यांचे दरही कमी असण्याची वाढलेलेच आहेत. भाज्यांचे दर कडाडलेले असताना मच्छीचे दरही कमालीचे वाढले आहेत. मच्छीमार्केटमध्ये कमी प्रमाणात मासे विक्रीला येत आहेत. मच्छीच्या उपलब्धततेवर सध्या कमालीची मर्यादा असल्याने मच्छीचे दरही गगनाला भिडले आहे. त्यामुळे खवय्यांना पावसाळ्यामध्ये वाढलेल्या दरांमुळे ना भाज्या खाता येत आहेत, ना मासे, अशी स्थिती आहे.*

# उपयुक्त गीर गाय

**जयसिंगपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा) :** भारतीय संस्कृतीत गाय अतिशय पूजनीय आहे. गायीमध्ये तेहतीस कोटी देव अर्थात तेहतीस प्रकारच्या शक्तींचे वस्तीस्थान असते. भारतीय अर्थव्यवस्था ज्याप्रमाणे शेती उत्पन्नावर संपूर्णतः: अवलंबून आहे, त्याचप्रमाणे भारतीय शेती संपूर्णपणे गोवंशावर म्हणजेच गाईवरच अवलंबून आहे. म्हणूनच लेखक मिलिंद देवल यांनी भारतीय गोवंश, त्याची उपयुक्तता व त्याची जन्मापासून मृत्यूपर्यंत घ्यायची काळजी याचा सविस्तर आढावा 'माझी गीर गाय' या पुस्तकात घेतला आहे.

गाय आजूबाजूची हवा शुद्ध करते. पाण्यातील दूषित जीव-जिवाणू मारून टाकण्याची क्षमता गायीच्या शेणामध्ये आणि गोमूत्रामध्ये आहे. त्याचा खत व कीटकनाशक म्हणूनही वापर करतात. गोमूत्राचा वापर केल्यामुळे वनस्पती सशक्त आणि निरोगी राहतात. गायीच्या दुधातून अ व ड जीवनसत्त्वे, प्रथिने व कॅल्शियम मोठ्या प्रमाणात मिळते. मानसिक चिंता आणि बरेचसे रोग दूर करण्याची क्षमता गायीच्या तुपामध्ये आहे. अशाप्रकारे गाय, गोमूत्र, शेण, दूध हे सर्वच घटक सजीवांना अत्यंत उपयुक्त आहेत म्हणूनच आपण तिला कामधेनू म्हणतो.

पुरातन काळापासून आर्थिक सुबत्तेचे निकष हे त्या व्यक्तीच्या जवळ असलेल्या गोधनावर निश्चित होत असे. भारतात गोवंशामध्ये वैविध्य आढळते. उदा. डांगी, देवणी, साहिवाल,



कांकरेज, वेचूर, खिल्लार, अमृतमहल, गीर कंधारी आदी दुग्धोत्पादनाबाबत गीर गोवंश हा विशेष प्रसिद्ध आहे. भारतात गुजरातच्या पश्चिम आणि दक्षिण भागामध्ये तसेच महाराष्ट्राच्या गुजरात सीमेजवळच्या भागात हा गोवंश अत्यंत चांगल्या पद्धतीने सांभाळला जातो. अमेरिकन शास्त्रज्ञांनी 'ब्राह्मणी' जातीची गाय गीर गोवंशांपासून विकसित केली आहे.

या पुस्तकात श्री. देवल गीर गोवंशातील गाय आणि बैलाची शारीरिक ठेवण सांगतानाच त्यांची दुग्धोत्पादनाची क्षमता विशद करतात. या गायी सर्वसाधारण सांभाळणीमध्ये दिवसाकाठी सहा ते सात लिटर दूध सहज देतात. व्यावसायिक सांभाळणाऱ्याकडे उत्तम खुराकावर दिवसाकाठी १० ते १२ लिटर दूध देतात. त्यांची किंमत साधारणपणे २५ ते ३० हजारांपर्यंत असते. आपल्या स्थानिक वंशाच्या गायीच्या दुग्धोत्पादनात खराब हवामान , दुष्काळ अशा आपत्तीमध्ये विशेष घट दिसून येत नाही.

दुग्धोत्पादनात एकवेळ लिटर परिमाणात कमी असेल; पण दुधाला दर चांगला मिळतो. स्थानिक गोवंशामध्ये रोगप्रतिकारकक्षमता मोठ्या प्रमाणावर असते. या गाईच बैल फ क्त आपल्या भारतीय शेतीत काम करू शकतात. परकीय वंशाचे बैल उन्हात काम करू शकत नाहीत. या गायींचे शेण पटकन कुजते व चांगल्या प्रतीचे खत तयार होते. यावरून भारतीय शेती वजा 'गाय'बरोबर एक मोठे शून्य हे समीकरण सिद्ध होते. गोधनाची काळजी घेण्यासाठी दोन-चार गाई सांभाळणारा शेतकरी आणि निव्वळ व्यावसायिक यांनी आपल्या गायींचा गोठा कसा ठेवावा याबाबतचे मार्गदर्शन श्री. देवल यांनी केले आहे. गोठ्याची रचना, गोठ्यातील जमीन, गव्हाण, पाण्याची व्यवस्था, जनावरांना बांधण्याची रचना, वैरणीची जागा, औषधोपचाराची व्यवस्था याविषयीची सविस्तर माहिती यामध्ये आहे. तसेच काही निरीक्षणेही दिलेली आहेत. नैसर्गिक ऋतुबदलांचा गायींच्या दुग्धोत्पादनावर प्रतिकूल परिणाम होऊ नये, यासाठी पावसाळा, हिवाळा व उन्हाळा या ऋतुंमध्ये गायींची विशेष काळजी घ्यावी लागते. आहार, विहार व निवारा या अनुषंगाने या ऋतुंमध्ये गायींची काळजी कशी घ्यावी हे लेखकाने सांगितले

# उत्तम शेती मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी




अशी म्हण, असे विचार नव्हे अशी परिस्थिती एकेकाळी आपल्या समाजात होती. 'कुटूंबाला किती एकर शेती आहे अन् किती धान्याची पोती घरात आहेत, किती गाय-बैल जनावरे दारात आहेत.' हे पाहून त्या घरी मुलगी दिली जायची. 'आयुष्यात काहीही झाले तरी चार-दोन एकर जमीन पदरात असताना उपाशी राहणार नाही.' ही श्रद्धा होती कोणे एके काळी या देशामध्ये.

पण, आता आपण अनुभवतो आहेत की ही परिस्थिती कशी बदलत गेली आहे. निसर्गाचा लहरीपणा, शासनाचे दुर्लक्ष तथा दुरदृष्टीचा अभाव, नियोजन शून्य कारभार व भ्रष्टाचार यामुळं शेती व शेतकरी यांच्याकडे दुर्लक्ष होत गेले. प्रगतीच्या नावाखाली शहरांची बेसुमार वाढ होत चालली अन खेडी ओस पडू लागली. आता 'उत्तम नोकरी व कनिष्ठ शेती...' अशी अवस्था झाली. नोकरी असेल तर त्याला सर्व बाजूंनी संरक्षण, दरमहा पगार, दरवर्षी पगारवाढ, महागाई वाढली तरी वाढ, हक्काची सुट्टी, रजा आणि सेवामुक्ती नंतर मरेपर्यंत पेन्शन पण ज्या शेतकऱ्याच्या जिवावर हे सर्व जीवन चालते त्याला काय मिळते? त्याच्यासाठी आलेले सुद्धा मधल्या मध्ये लुबाडले जाते त्यामुळे आज बहुतांश शेतकऱ्यांची अवस्था वाईट आहे. पाऊस वेळेवर नाही, पाण्याचे नियोजन नाही, पाणी असेल तर लाईट नाही, खते-बीबियाणे वा मेहनतीला वेळेवर पुरेसा पैसा नाही. सुगीच्या दिवसात काय चार-दोन पोती धान्य आले तर नेमके त्यावेळेला बाजारात दर नाही प्रत्येक ठिकाणी वागवणूक अडवणूक होत असल्याने आज वैफल्यग्रस्त, सतत तनावग्रस्त असणारा शेतकरी, हाताला काम नसणारी शेतकऱ्यांची तरूण मुले व्यसनाधिनतेकडे वळताना दिसतात.

थोडे इतिहासाकडे वळून पाहिले तर असे लक्षात येते की, यवनांच्या काळातील अस्थिर राजकीय परिस्थिती, सततच्या लढाया, लुटालूट, जाळपोळ त्याचबरोबर निसर्गाचा दुष्काळाचा घाला त्यामुळे शेतकरी उध्वस्त होत गेला. त्यानंतर इंग्रजांच्या काळात बऱ्यापैकी सुखी असणारी ग्रामीण संस्कृती, खेडे उध्वस्त होत गेले. शेतसारा धान्याच्या ऐवजी पैशाच्या रूपात घेण्याची इंग्रजांची पद्धती. त्यातून मुठभर सावकार-वतनदारांनी सामान्य शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन केलेली लुबाडणूक त्यामुळे शेती संपली सर्व परिस्थिती इंग्रज सरकार व समाजापुढे आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला.



महादेव माळी
एम.ए.एम.एड, सांगली.

देशाला स्वातंत्र्य मिळाले, आपण खूप आनंदी झालो खरे पण प्रगतीच्या अनेक समस्या देशापुढे होत्या. शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि महत्त्वाचे म्हणजे अन्नधान्य. देशाला पुरेल इतके अन्न धान्य आपल्या देशामध्येच उत्पादित करणे म्हणजेच अन्नधान्यामध्ये स्वयंपूर्ण होणे हे मोठे आव्हान होते. अन आपण ते सक्षमतेने पेललेही. आज 'आपला देश अन्नधान्यामध्ये स्वयंपूर्ण झाला आहे.' असे आपण अभिमानाने सांगतोही पण थोडे सूक्ष्मात जाऊन त्याचा अभ्यास केला तर लक्षात येईल की- आजची आपली अन्नधान्याची स्वयंपूर्णता खोटी व फसवी आहे. गोदामे अन्नधान्याने भरून पडलेली आहेत पण त्या अन्नधान्याचा उपयोग होत नाही. त्यामुळे ते खराब होत चालले आहे. त्याच वेळी लाखो टन अन्नधान्याची निर्यातही केली जाते अशा बातम्याही येतात अशावेळी आपल्या देशामध्ये ४०% दारिद्र्य रेषेखाली राहतात. त्यांना एकवेळेचेही पोटभरअन्न मिळत नाही, उपासपोटी,अर्धपोटी राहतात.त्यांची अन्नधान्ये खरेदी करण्याची क्षमता नाही. त्या सर्वांची आर्थिक स्थिती सुधारून खरेदी शक्ती वाढली तर या गोदामांमध्ये १ किलोही धान्य शिल्लक राहणार नाही.

स्वातंत्र्यानंतर 'हरितक्रांती' आणण्याचा प्रयत्न केला. नवनवीन संकरीत बी-बीयाणे, रासायनिक खते आणि सिंचनाच्या सोयी सुविधा उपलब्ध करून अन्नधान्य भरमसाठ वाढविणे एवढे ध्येय ठेवून काम केले व त्यात बऱ्याच अंशी यशस्वी झालो असलो तरी खोलवर विचार करता ते अपूर्णच राहिले आहे. म्हणूनच आता दुसऱ्या हरित क्रांतीची भाषा राज्यकर्ते करत आहेत. स्वातंत्र्याच्या पहिल्या दोनृ-तीन पंचवार्षिक योजनांमध्ये शेतीकडे जेवढे लक्ष दिले व गुंतवणूक केली तेवढी नंतरच्या काळात झाली नाही.

शेती आणि शेतकरी यांच्या विकासाच्या गप्पा मारून, जोरजोरात भाषणबाजी करून सर्वच राजकीय पक्षांचे नेते लोकांची दिशाभूल करण्यात यशस्वी झाले आहेत. या सामान्य शेतकऱ्यांच्या मनांच्या जिवावर सत्तेचा कायदा मात्र पुरेपूर घेतला पण या भोळ्या-भाबड्या, अडाणी शेतकऱ्यांच्या हातात मात्र धनुराज राहिला.

निव्वळ अन्नधान्याच्या उत्पादनातून शेतकरी सुखाने होत घास खाऊ शकणार नाहीत त्याची सर्वांगिण उन्नती झाली पाहिजे. हे पाहिले नाही. योजना खूप आखल्या गेल्या पण त्याचा हिशोब कागदावरच. हिशोबासाठी करोडो रुपये खर्च झाले पण प्रत्यक्षात काम काहीच नाही. कोणतीच योजना धड पूर्ण झाली नाही.

लोकसंख्येचा वाढता भस्मासूर त्यामुळे खाणाऱ्या तोंडाची होणारी वाढ अन् अन्नधान्य उत्पादनासाठीची उपलब्ध जमीन याचा मेळ कसा घालणार. यावर सर्वंकश उपाय गरजेचा आहे. तरच शेकडो शेतकऱ्यांच्या आत्महत्या व त्यांचे उध्वस्त होणारे संसार पाहण्याची नामुष्की येणार नाही.

दिवसेंदिवस शेतीचे पाणी कमी होऊ लागले आहे. शेतीच्या पाण्यासाठी बांधलेल्या धरणांचे पाणी आता फक्त शहरांना पिण्यासाठी तसेच पाण्याची उधळपट्टी करण्यासाठी व औद्योगिक वसाहतींना देण्यासाठीच खर्च होत आहे. त्यामुळे शेतीला पुरेसे पाणी नाही. शेतीसाठीच्या दीर्घकालीन पाणीपुरवठ्याच्या लहानमोठ्या पुरेशा योजना पूर्ण केल्या नाहीत. टेंभू, म्हैसाळ-ताकारीसारख्या योजना दूरदृष्टीने आखल्या खऱ्या पण नेत्यांच्या दूरदृष्टीचा व कर्माचा अभाव त्यातच प्रचंड भ्रष्टाचार त्यामुळे त्या अद्यापही पूर्ण होऊ शकल्या नाहीत. आणि नजीकच्या काळात लवकर पूर्ण होतील असेही नाही. दुष्काळग्रस्तांच्या डोळ्यातील अश्रूही आटले आहेत. पण पाण्याचे गाजर दाखवून सत्ता उपभोगण्यारांनी फक्त उपभोगच घेतला, आपली घरे भरली. शेती व शेतकरी आहे तिथेच आहे. नव्हे दिवसें दिवस त्याची स्थिती हालाखीची होत आहे. शेतकऱ्यांना पॅकेज दिले गेले. कर्जमाफी दिली गेली पण ती वरवरची मलमपट्टी आहे. अशा मलमपट्टीने पूर्ण जखम भरून येणार नाही कारण वर्तमानपत्रात जाहिर केली जाते त्यातला किती हिस्सा प्रत्यक्ष त्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला हा संशोधनाचा विषय आहे. बरे जी मदत ती पुरेशी नसते वा वेळेत मिळत नाही. त्याचे सारे उध्वस्त झाल्यानंतर मिळणारे चार पैसे काय कामाचे? यासाठी प्रभावी उपाययोजना, राजकीय इच्छाशक्ती व लोकांमध्ये जागृतीची नितांत आवश्यकता आहे.



# आवळा बहुगणी लागवड करा

पिक-पाणी

डॉ. जिनेंद्र धनपाल चौगुले
प्लॉट नं. २९, चंद्रघन, माहेर हॉस्पिटलजवळ नांदणी रोड, जयसिंगपूर. येथे संपर्क साधावा. फोन २२४५१९. मो. ९९२२७७२८१५

आवळा हे एक बहुगुणी कोरडवाहू फळपीक असून महाराष्ट्रात अतिशय चांगले उत्पादन देत आहे. आवळा फळात क जीवनसत्व असते. हे प्रमाण लिंबू वर्गीय फळापेक्षा ५ ते ७ पट जास्त आहे. या व्यतिरिक्त लोह, ब जीवन सत्व, चुना, सार, खनिज द्रव्ये आणि तंतूमय पदार्थ सुध्दा भरपूर प्रमाणात असतात, म्हणून आयुर्वेदात आवळ्यापेक्षा शक्तीदायी व सर्व गुणसंपन्न दुसरे फळ नाही. चवनप्राश त्रिफळाचुर्ण आणि कित्येक आयुर्वेदिक औषधामध्ये आवळा हाच मुख्य घटक असतो. आवळ्याचा मोरावळा, कँडी, लोणचे, चटणी, आवळासुपारी इ. पदार्थ तयार केले जातात. वर्षभरात एका माणसाने किमान १० कि. आवळे खावेत. त्यामुळे तुम्हाला आरोग्य तारूण्य आणि दिर्घायुष्य मिळवता येईल. जवळ जवळ १५० रोगावर आवळ्याचे विविध उपयोग करता येतो.

महाराष्ट्रात आवळा हे कोरडवाहू पीक म्हणून घेणे शक्य आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना यापिकाविषयी बऱ्याचशा गोष्टी माहित करून घेणे आवश्यक आहे. म्हणून आवळ्याची नवीन लागवड खाली दिले आहेत.

**१) जमिन व हवामानः** आवळा हे समशितोष्ण कटिबंधात चांगले वाढते. महाराष्ट्रात आवळा चांगला येऊ शकतो. आवळा काळ्या, मुरमाड, चांगला निचरा होणारे जमिन उत्तम, क्षारयुक्त जमिनीत सुध्दा आवळ्याची शेती करता येथील पण उत्पादनात घट येते.

**२) लागवड व जात :** आवळ्याची लागवड बियापासून केले असता ८ ते ९ वर्षांनी फळे येतात. पावसाळा संपत आला असताना म्हणजे शक्यतो ऑगस्ट – सप्टेंबर महिन्यात २२ बाय २२ फूट फूटचे खड्डे घेऊन, ६ बाय ६ अथवा ७ बाय ७ मीटर अंतरावर कलम केलेले रोप लावावेत. रोप लावताना रोपाभोवती पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. रोपे संध्या काळच्या वेळी लावावीत. अधिक उत्पादन मिळविण्याच्या दृष्टीने सुधारित जातीची लागवड म्हणजे बनारसी, कांचन कृष्णा, एन. ए. ७, एन. ए. १० जातीपैकी एकजात निवडावेत.



**३) पाणी व खत :** हे कमी पाण्यात येणारे झाड आहे. पहिले २ – ३ वर्ष पाण्याची काळजी घेतल्यास कोरडवाहू जमिनीत ही हे पीक पावसाचे पाण्यावर तग धरू शकेल. फेब्रुवारीपासून पाणी तोडावे लागते. डिसेंबर – जानेवारी महिन्यात नवीन पालवी आणि फुले येतात. ते ८ ते १५ दिवसामध्ये फळ धारणा होते. व नंतर जवळपास १०० दिवस फळे सुप्त अवस्थेत राहतात. पावसाच्या प्रथम आगमनाबरोबर फळे वाढीला सुरवात होते. फळाची तोडणी ऑक्टोंबर – नोव्हेंबर महिन्यात होत असते. पावसाळा सुरू होण्यापूर्वी प्रत्येक झाडाला ५ ते १० किलो चांगला कुजलेली शेणखत त्याचबरोबर १०० ग्रॅम नत्र, १०० ग्रॅम स्फूरद व ५० ग्रॅम पालाश द्यावा.

**४) उत्पादनः** एका एकरात साधारण ९० झाडे बसतात. पूर्ण वाढ झालेल्या झाडापासून सरासरी १०० ते १२५ किलो फळे मिळतात. म्हणजे साधारणतः ९००० ते ११००० किलो एकरी आवळ्याची उत्पादन मिळतो. तरी खर्च व जाताना एकरी रूपये ६०००० ते ७०००० पर्यंत नफा मिळवणे शक्य आहे. तरी शेतकऱ्यांना यांचा फायदा करून घ्यावा.